**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
**पुणे महानगरपालिका**
**जा.क्र.:- अतिमआ(ज)/उआ(सा.प्र.)/आस्था/प्र.७/२२४४**
**दिनांक :- २७/०७/२०१५**

## -: कार्यालयीन आदेश :-

**विषय:-** पुणे म.न.पा. हद्दीमधील पोलीस स्टेशनाकडे म.न.पा.कर्मचाऱ्यांना पंच म्हणून उपलब्ध करून देणेबाबत.

**संदर्भ :-** गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक डी.पी.पी. २०१२/प्र.क्र.१०/पोल-१०, दि.१२ मे २०१५.

सात वर्षे किंवा सात वर्षापेक्षा जास्त शिक्षा असलेल्या गुन्हयामध्ये सरकारी कर्मचारी पंच घेणेबाबत संदर्भांकित शासन निर्णय प्रसृत करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने पुणे म.न.पा. हद्दीमधील विविध पोलीस स्टेशन कडून, गुन्हयाच्या तपासादरम्यान सरकारी कर्मचारी पंच म्हणून घेण्याकरिता पुणे म.न.पा.कडे पत्रव्यवहार करीत आहे.

संदर्भांकित शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे तरतूदी नमूद करण्यात आल्या आहेत.

१) पंच फितुर होऊन दोषारोपसिध्दीचे प्रमाण कमी होणाऱ्या प्रकारस आळा घालण्याच्या दृष्टीने सात वर्षे किंवा सात वर्षापेक्षा जास्त शिक्षा असलेल्या गुन्हयांमध्ये सरकारी कर्मचारी पंच म्हणून घेण्याचा निर्णय सदर शासन निर्णयान्वये घेण्यात येत आहे.

२) ज्या गुन्हयामध्ये सात वर्षे किंवा सात वर्षापेक्षा जास्त शिक्षा नमूद केली असेल अशा प्रकरणांमध्ये तपासी अधिकारी यांनी शक्यतोवर सरकारी कर्मचाऱ्याची पंच म्हणून सेवा घ्यावी.

३) सदरची सेवा पंच म्हणून घेताना ज्या परिसरामध्ये खटल्याची सुनावणी होणार आहे त्या परिसरात वास्तव असणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यास पंच म्हणून घ्यावे जेणेकरून खटल्याच्या सुनावणीदरम्यान सदर पंचास उपस्थित राहणे सुलभ होईल.

४) पंच म्हणून घेत असलेल्या सरकारी कर्मचाऱ्याचे चारित्र्याबाबत प्रथम मौखिक स्वरूपात तपास अधिकाऱ्याने खातरजमा करून घ्यावी.

५) एकाच सरकारी कर्मचाऱ्यास अनेक गुन्हयांत वारंवार पंच म्हणून घेण्यात येवू नये.

६) गुन्हयातील फिर्यादी व आरोपी यांचे नातेवाईक असलेल्या सरकारी कर्मचाऱ्यास पंच म्हणून घेण्यात येवू नये.

उपरोक्त शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेता, पुणे मनपा हद्दीमधील पोलीस स्टेशनकडून, गुन्हयाचे तपास कामी पंच म्हणून कर्मचारी उपलब्ध करून देणेबाबत मागणी आल्यास त्यांना कर्मचारी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

तरी, सर्व संबंधित खातेप्रमुख/उप आयुक्त (परिमंडळ कार्यालये/महा.सहा.आयुक्त (क्षेत्रिय कार्यालये) यांना सुचित करण्यात येते की त्यांचे कार्यक्षेत्रामधील पोलीस स्टेशनकडून पंच म्हणून कर्मचारी उपलब्ध करून देण्याची मागणी आल्यास त्याप्रमाणे कार्यालयातील कर्मचारी उपलब्ध करून देण्याची व संबंधित सेवकांचे पत्ता फोन नंबर उपलब्ध करून देण्याची दक्षता घ्यावी.

त्याचप्रमाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून लाचेच्या सापळा प्रकरणी पंच म्हणून मनपा कर्मचाऱ्यांची मागणी केल्यास, त्याप्रमाणे कर्मचारी उपलब्ध करून देण्याची दक्षता घेण्यात यावी.

**(राजेंद्र जगताप)**
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
**पुणे महानगरपालिका**

**प्रत:-** १) सर्व खातेप्रमुख/उप आयुक्त (परिमंडळ क्र.१ ते ४)/महा.सहा.आयुक्त (क्षेत्रिय कार्यालय)
पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहिती व कार्यवाहीसाठी...

२) मा.पोलीस आयुक्त
पुणे शहर, पुणे-४११ ००१.

३) मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,पुणे-४११ ००१.
यांजकडेस माहितीस्तव....